**RNI No. MAHBIL /2009/31743**
**Regd. No. MCS/169/2016-18**

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार–ब

वर्ष २, अंक २९] गुरुवार ते बुधवार, जुलै २१-२७, २०१६/आषाढ ३०-श्रावण ५, शके १९३८ [पृष्ठे ५२, किंमत : रुपये २०.००

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### गृह विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० जून २०१६

### अधिसूचना

**महाराष्ट्र पोलीस अधिनियम.**

क्रमांक एमटीएस-०३१३/प्र.क्र.-३११/पोल-४.—मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ५ (ब) आणि त्याअनुषंगाने प्रदान करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून आणि याबाबत काढलेले आदेश, नियम किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नियंत्रणाखालील पोलीस विभागांतर्गत पोलीस मोटार परिवहन, नौका विभागातील सहायक पोलीस उप निरीक्षक सारंग, सहायक पोलीस उप निरीक्षक इंजिन ड्रायव्हर, पोलीस हवालदार खलाशी (डेक साईड), पोलीस हवालदार खलाशी (इंजिन साईड), पोलीस शिपाई खलाशी (डेक साईड) आणि पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड) गट-क या तांत्रिक पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे :—

**१.** या नियमांना, गृह विभागाच्या नियंत्रणाखालील पोलीस विभागाअंतर्गत पोलीस मोटार परिवहन, नौका विभागातील सहायक पोलीस उप निरीक्षक सारंग, सहायक पोलीस उप निरीक्षक इंजिन ड्रायव्हर, पोलीस हवालदार खलाशी (डेक साईड) पोलीस हवालदार खलाशी (इंजिन साईड), पोलीस शिपाई खलाशी (डेक साईड) आणि पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड), गट-क (सेवा प्रवेश) नियम, २०१६ असे संबोधण्यात यावे.

**२.** **व्याख्या.** या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अभिप्रेत नसेल तर,–

(अ) ' विभाग ' याचा अर्थ महाराष्ट्र शासनाचा गृह विभाग, असा आहे ;

(ब) ' महासंचालक ' याचा अर्थ पोलीस महासंचालक व पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई असा आहे ;

(क) ' शासन ' याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(ड) ' पोलीस दल ' याचा अर्थ, मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) च्या कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले पोलीस दल असा आहे ;

(इ) ‘मान्यताप्राप्त संस्था’ याचा अर्थ, शासनाने मान्यता दिलेली संस्था असा आहे ;

(ई) ‘माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा’ याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महा. ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा असा असून, यामध्ये शासनाने यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अन्य कोणत्याही परीक्षांचा समावेश होतो ;

(फ) ‘निवड समिती’ याचा अर्थ, या पदांच्या सेवा भरतीसाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी नियुक्त केलेली निवड समिती असा आहे.

**३. सहायक पोलीस उप निरीक्षक सारंग या पदावरील नियुक्ती.**—ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या आधारे खालील पदावर कार्यरत असलेल्या योग्य व्यक्तींमधून पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

(अ) पोलीस हवालदार खलाशी (डेक साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० ते २२६ बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार सारंग कॉम्पेटन्सी सर्टिफिकेट धारण केले आहे.

**किंवा**

(ब) येथील पदधारक उपलब्ध न झाल्यास पोलीस शिपाई खलाशी (डेक साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० ते २२६ बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार सारंग कॉम्पीटेन्सी सर्टिफिकेट धारण केले आहे.

**४. सहायक पोलीस उप निरीक्षक इंजिन ड्रायव्हर या पदावरील नियुक्ती.**—खालील पदधारकांमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या आधारे योग्य व्यक्तींमधून पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ;

(अ) पोलीस हवालदार खलाशी (इंजीन साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर ३ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० ते २२६ बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार सेकंड क्लास इंजिन ड्रायव्हर कॉम्पीटन्सी सर्टिफिकेट धारण केले आहे.

**किंवा**

(ब) येथील पदधारक उपलब्ध न झाल्यास पोलीस शिपाई खलाशी (इंजीन साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर ५ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० ते २२६ बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार सेकंड क्लास इंजिन ड्रायव्हर कॉम्पीटन्सी सर्टिफिकेट धारण केले आहे.

**५. पोलीस हवालदार खलाशी (डेक साईड) या पदावरील नियुक्ती.**—पोलीस शिपाई खलाशी (डेक साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर २ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार सारंग कॉम्पीटन्सी सर्टिफिकेट धारण केलेल्या पदधारकांमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या आधारे योग्य व्यक्तीमधून पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

**६. पोलीस हवालदार खलाशी (इंजीन साईड) या पदावरील नियुक्ती.**—पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड) पद धारण करणाऱ्या व त्या पदावर २ वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा झालेल्या आणि ४० बीएचपी इंजिनचे इनलँड व्हेसल ॲक्ट, १९१७ (१९१७ चा १) च्या कलम २१(१) नुसार परमिट इंजिन ड्रायव्हर कॉम्पीटन्सी सर्टिफिकेट धारण केलेल्या पदधारकांमधून ज्येष्ठता अधीन पात्रतेच्या आधारे योग्य व्यक्तींमधून पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

**७. पोलीस शिपाई खलाशी (डेक साईड) या पदावरील नियुक्ती.**—खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :—

(१) **वय** : ज्यांचे वय अठरा वर्षांपेक्षा कमी नाही आणि पंचवीस वर्षांपेक्षा जास्त नाही

परंतु, मागासवर्गीय उमेदवार यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

(२) **शैक्षणिक अर्हता** : माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असावी.

(३) खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता धारण करतील :—

| | | महिला | पुरुष |
|---|---|---|---|
| (*i*) | उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १५७ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| (*ii*) | छाती | ... | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

**(४) शारीरिक चाचणी (१०० गुण).**—जे उमेदवार विहित शारीरिक व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असतील अशा उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण १०० गुणांची असेल :—

**(अ) पुरुष उमेदवार.—**

(अ) समुद्रामध्ये ५० मिटर पर्यंत पोहणे (कपड्यांसह) ... ... ५० गुण

(ब) समुद्रामध्ये ०३ मिनीटांपर्यंत तरंगणे ... ... २५ गुण

(क) समुद्रामध्ये ०३ मिटर वरून फ्री जम्प ... ... २५ गुण

**एकूण ... ... १०० गुण**

**(ब) महिला उमेदवार.—**

(अ) समुद्रामध्ये २५ मिटर पर्यंत पोहणे (कपड्यांसह) ... ... ५० गुण

(ब) समुद्रामध्ये ०३ मिनीटांपर्यंत तरंगणे ... ... २५ गुण

(क) समुद्रामध्ये ०३ मिटर वरून फ्री जम्प ... ... २५ गुण

**एकूण ... ... १०० गुण**

**(५) लेखी चाचणी (७५ गुण)**

**(अ)** जे उमेदवार शारीरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवतील, त्यांच्यामधून गुणवत्ता क्रमानुसार, प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमुद केलेल्या पदसंख्येच्या १ : १५ या प्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना ७५ गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**(ब)** लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल,—

(*i*) अंकगणित

(*ii*) सामान्यज्ञान व चालू घडामोडी

(*iii*) निबंध लेखन

निबंधलेखन वगळता सदर चाचणी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल.

**(६)** या नियमातील उपखंड (४) व (५) मध्ये नमूद केलेल्या निकषांवरून तयार करण्यात आलेल्या निकालांच्या आधारे निवड समिती उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करतील.

**८.** पोलीस शिपाई खलाशी (इंजिन साईड) या पदावरील नियुक्ती,—

खालील अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल,—

(१) **वय.—**ज्यांचे वय अठरा वर्षापेक्षा कमी नाही आणि पंचवीस वर्षापेक्षा जास्त नाही;

परंतु, मागासवर्गीय उमेदवार यांच्या बाबतीत कमाल वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल.

(२) **शैक्षणिक अर्हता.—**माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली आहे आणि शासनमान्य संस्थेतून मोटर मेकॅनिक किंवा डिझेल मेकॅनिक किंवा ट्रॅक्टर मेकॅनिक किंवा ऑटो इलेक्ट्रिशियन किंवा इलेक्ट्रॉनिक्स ट्रेडमधील आय.टी.आय कोर्स यशस्विरित्या पूर्ण केला असावा.

(३) खालीलप्रमाणे शारीरिक पात्रता धारण करतात,—

| | | महिला | पुरुष |
|---|---|---|---|
| (*i*) | उंची | १५५ से.मी. पेक्षा कमी नसावी | १५७ से.मी. पेक्षा कमी नसावी |
| (*ii*) | छाती | ... | न फुगवता ७९ से.मी. पेक्षा कमी नसावी व न फुगवलेली छाती व फुगवलेली छाती यातील फरक ५ सें.मी. पेक्षा कमी नसावा. |

(४) शारीरिक चाचणी (१०० गुण).—जे उमेदवार विहित शारीरिक व शैक्षणिक पात्रता पूर्ण करीत असतील अशा उमेदवारांना शारीरिक चाचणी द्यावी लागेल. शारीरिक चाचणी पुढीलप्रमाणे एकूण १०० गुणांची असेल :—

**(अ) पुरुष उमेदवार.—**

(अ) समुद्रामध्ये ५० मिटर पर्यंत पोहणे (कपड्यांसह) ... ... ५० गुण

(ब) समुद्रामध्ये ०३ मिनीटांपर्यंत तरंगणे ... ... २५ गुण

(क) समुद्रामध्ये ०३ मिटर वरून फ्री जम्प ... ... २५ गुण

**एकूण ... ... १०० गुण**

**(ब) महिला उमेदवार.—**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) समुद्रामध्ये २५ मिटर पर्यंत पोहणे (कपड्यांसह) | ... | ... | ५० गुण |
| (ब) समुद्रामध्ये ०३ मिनीटांपर्यंत तरंगणे | ... | ... | २५ गुण |
| (क) समुद्रामध्ये ०३ मिटर वरून फ्री जम्प | ... | ... | २५ गुण |
| **एकूण** | ... | ... | **१०० गुण** |

**(५) लेखी चाचणी (७५ गुण)**

**(अ)** जे उमेदवार शारीरिक पात्रता चाचणीत किमान ५० टक्के गुण मिळवतील, त्यांच्यामधून गुणवत्ता क्रमानुसार प्रसिद्ध केलेल्या जाहिरातीत प्रवर्गनिहाय नमूद केलेल्या पदसंख्येच्या १ : १५ याप्रमाणात प्रवर्गनिहाय उमेदवारांना ७५ गुणांच्या लेखी परिक्षेसाठी पात्र ठरविण्यात येईल.

**(ब)** लेखी चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल,–

(*i*) अंकगणित

(*ii*) सामान्यज्ञान व चालू घडामोडी

(*iii*) निबंध लेखन

निवंधलेखन वगळता चाचणी वस्तुनिष्ठ स्वरुपाची असेल.

**(६)** या नियमातील उपखंड (४) व (५) मध्ये नमूद केलेल्या निकषांवरून तयार करण्यात आलेल्या निकालांच्या आधारे निवड समिती उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करतील.

**९. परिवीक्षा कालावधी.—**नियम ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती ६ महिने कालावधीकरिता परिवीक्षाधीन राहील. या पदावर नियुक्ती नंतर त्याला/तिला राज्य पोलीस दलाच्या कोणत्याही पोलीस प्रशिक्षण शाळा येथे ०३ महिन्यांचे मुलभुत पोलीस प्रशिक्षण तसेच राज्य व मुंबई शहराच्या अंतर्गत असलेल्या सागरी जिल्हा नौका विभागातील ०३ महिन्यांचे क्षेत्रिय प्रशिक्षण यशस्विरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. तसेच परिविक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक राहील. त्याने/तिने प्रशिक्षण यशस्विरित्या पूर्ण न केल्यास किंवा परिवीक्षा कालावधी यशस्वीरित्या पूर्ण न केल्यास किंवा तो/ती त्या पदासाठी योग्य नसल्याचे आढळून आल्यास तो/ती सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील.

**१०.** नियम ३, ४, ५ ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने, त्याबाबतीत केलेल्या नियमानुसार हिंदी आणि मराठी भाषा परीक्षा अगोदर उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या उत्तीर्ण करण्यापासून सूट मिळालेली नसेल तर, त्याला/तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

**११.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेला संगणक हाताळण्याबाबतचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

**१२.** वैद्यकीय तपासणी.–नियम ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाने नियुक्त केलेल्या व्यक्तीने याबाबत प्राधिकृत केलेल्या शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून वैद्यकीयदृष्ट्या पात्र (Medical Fit) असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. वैद्यकीय चाचणीत दृष्टीदोष, वर्णांधपणा, गुडघ्यास गुढघा लागणे, सपाट तळवे आणि त्वचा रोग व छातीचे रोग व महासंचालकांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचण्यांचा समावेश राहील.

**१३.** नियम ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तीस पोलीस विभागातील सेवेच्या अनुषंगाने योग्यता आणि पात्रता तपासण्यासाठी मानसिक चाचणी देणे आवश्यक राहील. ही चाचणी नियुक्तीच्या दोन महिन्यांच्या आत विशेष किंवा उप पोलीस महानिरीक्षक, मोटार परिहवन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निवड केलेल्या पोलीस प्रशिक्षण शाळेमध्ये घेण्यात येईल. मानसिक चाचणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, यांचेकडील सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून पार पाडण्यात येईल. सदर चाचणीत उमेदवार अपात्र आढळल्यास, त्याची सेवा समाप्त करण्यात येईल.

**१४.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदांवर नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्य व मुंबई शहर यांच्या अंतर्गत सागरी जिल्हे/पोलीस नौका कर्मशाळा/सागरी मुख्यालय या कोणत्याही ठिकाणी बदलीस पात्र राहील.

**१५.** नियम ३, ४, ५, ६, ७ व ८ मध्ये नमूद केलेल्या पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीस मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (१९५१ चा मुंबई २२) मुंबई पोलीस मॅन्युअल, १९५९ मुंबई पोलीस (शिस्त व अपिल) नियम, १९५६ महाराष्ट्र पोलीस (सेवाभरती) नियम, २००६ आणि शासन आणि महासंचालक यांनी वेळोवेळी विहित केलेले तत्सम नियम किंवा आदेश लागू रहातील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**सु. ज. सोवितकर,**
शासनाचे उप सचिव.

## HOME DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg,
Mumbai 400 005, dated 30th June 2016.

MAHARASHTRA POLICE ACT,

No. MTS.0313/CR-311/Pol.—In exercise of the powers conferred by clause (b) of section 5 of the Maharasthra Police Act, (XXII of 1951), and of all other powers enabling it in this behalf, and in supersession of all Rules, orders or instruments made in this behalf, the Government of Maharashtra is hereby pleased to make the following rules for regulating recruitment to the Technical posts of Assistant Police Sub-Inspector Sarang, Assistant Police Sub-Inspector Engine Driver, Police Head Constable Khalashi (Deck side), Police Head Constable Khalashi (Engine Side), Police Constable Khalashi (Deck Side) and Police Constable Khalashi (Engine side), Group C, in the Launch Section of the Police Motor Transport, in the Police Department under administrative control of the Home Department of the Government of Maharashtra, namely:-

1. *Short title.*—These rules may be called Assistant Police Sub-Inspector Sarang, Assistant Police Sub-Inspector Engine Driver, Police Head Constable Khalashi (Deck side), Police Head Constable Khalashi (Engine Side), Police Constable Khalashi (Deck Side) and Police Constable Khalashi (Engine side) Group C, in the Motor Transport Section of the Police Department (Recruitment) Rules, 2016.

2. *Definition.*—In these Rules, unless the context requires otherwise :—

(*a*) " Department " means the Home Department of the Government ;

(*b*) " Director General " means the Director General and Inspector General of Police, Maharashtra State, Mumbai;

(*c*) " Government " means the Government of Maharashtra;

(*d*) " Police Force " means the Police Force constituted under section 3 of the Maharashtra Police Act (XXII of 1951);

(*e*) " Recognized institution " means an institution recognized by the Government;

(*f*) " Secondary School Certificate Examination " means the Secondary School Certificate Examination conducted by the Divisional Board established under the Maharashtra Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by the Government to be equivalent thereto;

(*g*) " Selection Committee " means the Selection Committee set up by the Director General of Police, Maharashtra State, Mumbai.

3. *Appointment to the post of Assistant Police Sub-Inspector Sarang*.—Appointment to the post of Assistant Police Sub-Inspector Sarang shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of,—

(*i*) Police Head Constable Khalashi (Deck Side) who has completed five years' service in that post and possesses the necessary Certificate of Competency as Sarang of 40-226 BHP engines as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917 (1 of 1917) ;

OR

(*ii*) In case candidates mentioned at (*i*) are not available, Police Constable Khalashi (Deck Side) who has completed three years' service in that post and possesses the necessary Certificate of Competency as Sarang of 40-226 BHP engines as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917 (1 of 1917).

4. *Appointment to the post of Assistant Police Sub-Inspector Engine Driver.*—Appointment to the post of Assistant Police Sub-Inspector Engine Driver shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness, from amongst the persons holding the post of,—

(*i*) Police Head Constable Khalashi (Engine Side) who has completed three years' service and possesses the necessary Certificate of Competency as Second Class Engine Driver of (40-226 BHP) as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917(1 of 1917)

OR

(*ii*) Police Constable Khalashi (Engine Side) who has completed three years' service and regular service in that post and possesses the necessary Certificate of Competency as Second Class Engine Driver of (40-226 BHP) as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917 (1 of 1917);

5. *Appointment to the post of Police Head Constable Khalashi (Deck Side).*—Appointment to the post of Police Head Constable Khalashi (Deck Side) shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority, subject to fitness, from amongst the persons holding the post of Police Constable Khalashi (Deck Side) who has completed two years' service in that post and possesses the requisite Competency Certificate as Sarang (for 40 BHP Engine) as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917 (1 of 1917).

6. *Appointment to the post of Police Head. Constable Khalashi (Engine Side)*.—Appointment to the post of Police Head Constable Khalashi (Engine Side) shall be made by promotion of a suitable person on the basis of seniority subject to fitness from amongst the persons holding the post of Police Constable Khalashi (Engine Side) and who have completed two years' service in that post and possess the requisite competency Certificate as Permit Engine Driver on Mechanically Propelled Vessel of 40 BHP Engine as per sub-section (*1*) of section 21 of the Inland Vessel Act, 1917.

7. *Appointment to the post of Police Constable Khalashi (Deck Side).*—Appointment to the post of Police Constable Khalashi (Deck Side) shall be made by nomination from the candidates who fulfill the following requirements :—

(1) **Age :** not less than eighteen years and not more than twenty-five years of age:

Provided that, the upper age limit shall be relaxed up to five years in respect of candidates, who are Backward Class candidates

(2) **Educational qualification :** Have passed the Secondary School Certificate Examination.

(3) **Fulfill following Physical qualification** :

| | | Female | Male |
|---|---|---|---|
| (*i*) | Height | Shall not be less than 155 centimeters | Shall not be less than 157 centimeters |
| (*ii*) | Chest | …… | Shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not less than 5 centimeters. |

(4) **Physical test (100 marks) :** The candidates who fulfill the physical and educational qualifications shall be required to appear for a Physical Fitness Test. The Physical Fitness Test shall be of a total 100 marks as follows namely :—

(B) MALE CANDIDATES :

| | | |
|---|---|---|
| (d) Swimming in sea (wearing clothes) up to 50 meters | … | 50 marks |
| (e) Floating in sea for 03 minutes | … | 25 marks |
| (f) Free Jump in sea from 03 meters | … | 25 marks |
| | | 100 marks |

(B) FEMALE CANDIDATES :

| | | |
|---|---|---|
| (a) Swimming in sea (wearing clothes) up to 25 meters | … | 50 marks |
| (b) Floating in sea for 03 minutes | … | 25 marks |
| (c) Free Jump in sea from 03 meters | … | 25 marks |
| | … | 100 marks |

(5) **Written test (75 marks) :**

(A) Candidates securing a minimum of 50% marks in the Physical Fitness Test shall be eligible to be called to appear for a Written test of 75 marks in the ratio 1:15 of vacancies advertised in the respective categories.

(B) The Written test shall include the following subjects namely :—

(*iv*) Arithmetic.

(*v*) General Knowledge and current affairs.

(*vi*) Essay writing.

Except essay writing the test shall be of objective type.

(6) The Selection Committee shall prepare a merit list from amongst the candidates based on the results of the two criteria enumerated at sub-clauses (4) and (5) of this rule.

8. *Appointment to the post of Police Constable Khalashi (Engine Side).*—Appointment to the post of Police Constable Khalashi (Engine Side) shall be made by nomination from amongst the candidates who fulfill the following requirements :—

(1) *Age*: not less than eighteen years and not more than twenty-five years of age:

Provided that, the upper age limit shall be relaxed up to five years in respect of candidates, who are Backward Class candidates.

(2) *Educational qualification*: Have passed the Secondary School Certificate Examination and successfully completed the I.T.I. course in Motor Mechanic or Diesel Mechanic or Tractor Mechanic or Auto Electrician or Electronics trade from a recognized institution.

(3) *Fulfill following Physical qualification:—*

| | *Female* | *Male* |
|---|---|---|
| (*i*) Height | Shall not be less than 155 centimeters | Shall not be less than 157 centimeters. |
| (*ii*) Chest | | shall not be less than 79 centimeters deflated and the difference between deflated chest and expanded chest shall not less than 5 centimeters. |

(4) *Physical test (100 marks)* : The candidates who fulfill the physical and educational "qualifications shall be required to appear for a Physical Fitness Test. The Physical Fitness Test shall be of a total 100 marks as follows namely :—

(B) MALE CANDIDATES :

| | | |
|---|---|---|
| (d) Swimming in sea (wearing clothes) up to 50 meters | ... | 50 marks |
| (b) Floating in sea for 03 minutes | ... | 25 marks |
| (c) Free Jump in sea from 03 meters | ... | 25 marks |
| | | 100 marks |

(B) FEMALE CANDIDATES :

| | | |
|---|---|---|
| (d) Swimming in sea (wearing clothes) up to 25 meters | ... | 50 marks |
| (b) Floating in sea for 03 minutes | ... | 25 marks |
| (c) Free Jump in sea from 03 meters | ... | 25 marks |
| | | 100 marks |

(5) *Written Test (75 marks) :*

(A) Candidates securing a minimum of 50% marks in the Physical Fitness Test shall be eligible to be called to appear for a Written Test of 75 marks in the ratio of 1:15 of vacancies advertised in the respective categories.

(B) The written Test shall include the following subjects, namely :—

(*iii*) Arithmetic.

(*iv*) General Knowledge and current affairs.

(*iii*) Essay writing

Except essay writing the test shall be objective type.

(6) The Selection Committee shall prepare a merit list from amongst the candidates based on the results of the two criteria enumerated at sub rules (4) and (5).

9. *Probation period* .— A person appointed to the post mentioned in rules 7 and 8 by nomination shall be on probation for a period of six months. Person appointed shall be required to complete successfully the three months basic Police Training at any Police Training School of Maharashtra State Police and three months field training at any coastal district Launch unit in the State and Mumbai City. He shall be required to complete the probation period successfully. If he does not complete the prescribed training or does not complete the probation period or is not found suitable for the post, his services shall be liable to be terminated.

10. *Passing of Examination*.—A person appointed to the post mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be required to pass examinations in Hindi and Marathi according to the rules made in that behalf, unless he has already passed or has been exempted from passing those examinations.

11. *Certificate of Examination*.—A person appointed to the post mentioned in rule 3, 4, 5, 6, 7 and 8 should possess a certificate in Computer Operation prescribed by the Directorate of Information and Technology, Government of Maharashtra from time to time.

12. *Medical fitness'*.—The medical fitness of a person prior to appointment on the post mentioned in rule 7 and 8 shall be certified by a Government Medical Officer authorized in this behalf. The medical test shall consist of tests for squinteye, color blindness, knock knees, flat foot and skin chest diseases and any other medical tests prescribed by the Government of Maharashtra or Director General of Police, Maharashtra State, Mumbai from time to time.

13. *Test to be undergone*.—A person appointed to the post mentioned in rule 7 and 8 shall have to undergo a psychological test to ascertain suitability and fitness for serving in the Police force. The test shall be conducted within two months from the date of appointment, and at any Police Training School in the State of Maharashtra .The psychological test shall be conducted by competent Medical Officer of Government Medical College. Candidate found unfit in the said psychological test shall be liable to be terminated from the service.

**14.** *Transfer*.—A person appointed to the post mentioned in rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be liable for transfer anywhere amongst the coastal districts or Police Launch workshops/Coastal Headquarters in the State of Maharashtra and Mumbai City.

**15.** *Rules Applicable*.— A person appointed to the post mentioned in the rules 3, 4, 5, 6, 7 and 8 shall be governed by the Maharashtra Police Act, 1951, the Bombay Police Manual, 1959, the Bombay Police (Discipline and appeal). Rules, 1956 and similar other rules or orders prescribed by the Government and the Director General of Police, Maharashtra State, Mumbai from time to time.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. J. SOVITKAR,
Deputy Secretary to government.